दिनांक :

सू च ना

# अनु.जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती / इतर मागासवर्ग / विशेष मागास प्रवर्ग

## ( Only For SC / VJNT / OBC / SBC/ST ) विद्यार्थ्यांच्यासाठी

# भारत सरकारची मागासवर्गीय शिष्यवृत्ती आणि फ्रीशिप : 2016-17

## ११वी, बी.ए./बी.एस्सी / बी.सी.एस. भाग १ मधील विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी

### महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांसाठी

**या SC शिष्यवृत्तीसाठी उत्पन्नाची वार्षिक मर्यादा रुपये 2,00,000/- इतकी आहे व OBC / SBC/ VJNT यांसाठी उत्पनाची वार्षिक मर्यादा रुपये 1,00,000/- इतकी आहे.** उत्पन्न हे 1-4-2015 ते 31-3-2016 या कालावधीतील आवश्यक आहे. शिष्यवृत्तीचे अर्ज मिळणेसंबंधीची सूचना खालीलप्रमाणे लावलेली आहे. **रुपये 100000/- पेक्षा कमी असलेल्या विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप व 6,00,000 पेक्षा कमी उत्पन्न असणा-या विद्यार्थ्यांनी बीसी.फ्रीशिप मिळेल. विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश प्रक्रियेवेळी** आपला प्रवेश निश्चित झाल्यानंतर आपले अर्ज ऑनलाईन भरुन **कार्यालयात सौ.पवार यांचेकडे** आणून जमा करावयाचा आहे. फॉर्मसोबत आपली सर्व कागदपत्रे, युजरनेम व पासवर्ड व ऑन लाईन फॉर्मची हार्डकॉपी आणून जमा करावी. सविस्तर वेळापत्रक विद्यार्थ्यांनी कार्यालयात येऊन पहावे.

### शिष्यवृत्तीच्या व फ्रीशिपच्या अर्जासोबत खालील क्रमानेच कागदपत्रे जोडावयाची आहेत.

१. शाळा सोडल्याच्या दाखल्याची [दहावी] साक्षांकित झेरॉक्स प्रत.

२. अर्जदार विद्यार्थी/विद्यार्थिनीचा जातीचा दाखला तहसीलदार यांनी दिलेला विहित नमुन्यातील झेरॉक्स प्रत

३. उत्पन्नाचा दाखला : शेती, व्यवसाय अथवा खाजगी नोकरी करणा-यांच्यासाठी मान.तहसीलदार यांनी १-४-२०१५ ते ३१-३-२०१६ या कालावधीचा.

४. शासकीय वा निमशासकीय सेवेत असणा-यांनी त्यांच्या कार्यालय प्रमुखाचा वरील कालावधीचा दाखला, मूळ पगार, महागाई भत्ता, घरभाडे व इत्तर सर्व भत्ते ( Form no.१६)यांच्या तपशीलासह.ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न ४,५०००० पर्यंत आहे त्यांनी नॉनक्रेमिलेअर सर्टिफिकेट जोडणे आवश्यक आहे.

५. पेन्शन असणा-यांनी, बँकेचा १-४-२०१५ ते ३१-३-२०१६ या कालावधीचा दाखला

६. इयत्ता दहावी व १२ वी गुणपत्रिका व प्रमाणपत्र, गतवर्षी पास झालेल्या सर्व परीक्षेची साक्षांकित गुणपत्रिका.

७. शैक्षणिक वर्षात शिष्यवृत्ती मिळणेस खंड पडला असल्यास रुपये १००/- च्या कोर्ट फी स्टॅम्पवर ॲफिडिव्एट करुन मूळ ॲफिडिव्एट जोडावयाचे आहे.

८. ऑन लाईन अर्ज भरताना प्रत्येक वर्गाप्रमाणे जी फी दिली आहे. त्याप्रमाणेच फी भरावयाची आहे अन्यथा योग्य ती शिष्यवृत्ती मिळणार नाही (सोबत फी ची माहिती लावली आहे)

९. ज्या विद्यार्थ्यांनी गेल्यावर्षी फॉर्म भरला आहे त्यांनी आपला पासवर्ड नवीन तयार करावयाचा आहे.

१०. ऑन लाईन फॉर्म भरण्यासाठी www.mahaeschol.maharashtra.gov.in या संकेत स्थळावरुन फॉर्म भरावयाचे आहेत. त्याची सूचना वेळोवेळी आपणांस दिली जाईल फॉर्म भरणे सुरु आहे. ST प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी www.etribal.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरुन फॉर्म भरावयाचे आहेत.

११. बँक खाते क्रमांक व आधार कार्ड ची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आपले आधार कार्ड आपल्या बँक खात्याशी संलग्न करावा म्हणजे आपली शिष्यवृत्ती आपल्या बँक खात्यावर जमा होईल. ऑनलाईन अर्ज भरतेवेळी प्रत्येक वर्गानुसार जी फी सांगितली आहे तीच फी अर्जामध्ये भरावयाची आहे.

**मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी स्वत:चे राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक व आधार कार्ड (बँकेशी संलग्नअसलेले)जोडणे अनिवार्य आहे. त्याशिवाय कोणत्याही शिष्यवत्तीचा लाभ घेता येणार नाही.**